

R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५६ वे, अंक ४था, मुंबई । जून २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 4, Mumbai I June 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## शिवराज्याभिषेकास ३५० वर्ष पूर्ण...



निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक ४था,
जून २०२३
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष



**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९



अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


# सामुदायिक व्रतबंध सोहळे



सोलापूर



बेळगाव




नाशिक



मुलुंड



FE INDIA'S BEST BANKS AWARDS
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates
on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# संपादकीय

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अहर्निश झटणारी मध्यवर्ती संस्था म्हणून ओळखली जाते. संस्थेमार्फत निरनिराळ्या कल्याणकारी उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक मदत, परदेशी मुलांसाठी कर्जाऊ शिष्यवृत्ती, वैद्यकीय सहाय्य, संस्थेतर्फे अनेक राबविण्यात येणारी सामाजिक उपक्रम अशा विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. संस्थेमार्फत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे उपक्रम देखील दरमहा प्रसिद्ध केले जाते. समाजातील जास्तीत हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. पारितोषिक देऊन त्यांना प्रोत्साहीत करणे. समाजातील गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे. विवाह समस्या आणि त्यामध्ये अडचणी दूर करण्यासाठी वधू व वर पित्यांना मार्गदर्शन करणे. अशी अनेक कामे आज मंडळ करीत आहे. समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी अनेक कामे हाती घ्यावयाची आहेत. ती मुबलक पैसाशिवाय व सहाय्याशिवाय होणार नाहीत. आर्थिक पाठबळाबरोबरच मनुष्यबळाची देखील तितकीच गरज आहे. समाजाचे हे महत्तम काम करण्यासाठी अनेक तरुणांनी आता पुढे आले पाहीजे. नव्या रक्ताची, नव्या दमाची आज संस्थेला जरुरी भासत आहे. आपल्या समाजाची सेवा करण्यास व प्रगती साधण्यास आपणच पुढे झाले पाहीजे. अनेक तरुण मंडळी हे समाजकार्य आहे म्हणून मागे राहतात. परंतु यात कमीपणा मानण्याचे काही कारण नाही. आपला समाज प्रगतीपथावर नेण्यास आपणच पुढे व्हावयास हवे. मंडळास अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. आपल्या मध्यवर्ती संस्थेस सहकार्य करावे, ही अपेक्षा. समाजातील अजूनही बांधव सदस्य होत नाही. मध्यवर्ती मंडळाचे जास्तीत जास्त सभासद व्हावेत अशी अपेक्षा करीत आहे.

**मिलिंद सरदेशमुख**
संपादक

# आमच्या तसेच संस्थेच्या आयुष्यातील भाग्याचा क्षण श्री लक्ष्मीनारायण मूर्तींची प्रतिष्ठापना

**श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष**

दि. १३, १४ व १५ मे रोजी आपल्या संस्थेच्या लक्ष्मीनारायण सभागृहात आपल्या सर्वांच्या कृपेने व आशिर्वादाने श्री लक्ष्मीनारायण मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली व या सोहळ्याचे एक यजमान म्हणून पूजेला बसण्याची संधी प्राप्त झाली. त्याबद्दल मी व माझे सहकारी कै. कृ. ह. कब्बूर व सौ. राधाबाई कब्बूर तसेच संस्थेच्या सर्व माजी पदाधिकाऱ्यांचे ऋणी असू.

या नेत्रदिपक सोहळ्याअंतर्गत श्री लक्ष्मीनारायणांची पांढऱ्या व्हिएतनाम मार्बल मधील अतिशय सुंदर व रेखीव मुर्ती बसविण्यात आल्या आहेत व यथापूर्ण धार्मिक विधी करून श्री. रविंद्र पाठक गुरुजीच्या मार्गदर्शनाखाली त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या सोहळ्याला मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांचेसह श्री. शरदचंद्र झरेगांवकर, श्री. रवींद्र आवटी, श्री. राजेंद्र खेडलेकर, श्री. प्रसाद ठकार, श्री. मिलिंद सरदेशमुख, सौ. पुष्पा कुलकर्णी, सौ. रोहिणी तडवळकर, श्री. सदानंद घोटीकर, श्री. आनंद कुलकर्णी, श्री. विनोद मांडके आदि उपस्थित होते आणि बडोद्याहून श्री. नितिन शहापूरकर व सौ. शहापूरकर

तसेच दादर, विलेपार्ले, कल्याण, डोंबिवली येथील सभासदांनी अगत्याने हजेरी लावून या सोहळ्याचा आनंद द्विगुणीत केला. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेश सरचिटणीस श्री. सदानंद (नंदू) पावगी आणि श्री. पद्मनाभन हे उपस्थित राहून या विधिवत झालेल्या सोहळ्याचे कौतुक केले.

पूर्वी बसविलेल्या श्री लक्ष्मीनारायणाची मूर्ती या मातीच्या होत्या व त्या दिवसेंदिवस जीर्ण होत होत्या. त्यामुळे नवीन मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करणे अगत्याचे होते. संस्थेचे अध्यक्ष मा. विलास जोशी यांनी इच्छा व्यक्त केली की, आपण सध्या असलेल्या मातीच्या मूर्तींच्या जागी भव्यदिव्य श्री लक्ष्मीनारायणाची मूर्त्या बसविल्या पाहिजेत. त्यांच्या या विनंतीस मान देऊन आम्ही सर्वांनी नवीन मूर्तींची प्राणप्रतिष्ठा या सभागृहात केली आहे. श्री. गोपाल शर्मा (राजस्थान) या सुप्रसिद्ध कारागिरानी व्हिएतनाम मार्बलमधून या मूर्ती बनविण्यात आल्या. त्यामुळे आपल्या लक्ष्मीनारायण सभागृहात एक वेगळे चैतन्य निर्माण झाले आहे.

या मंगलप्रसंगी मी व माझे सर्व सहकारी आपल्या पूर्वजांचे तसेच माजी पदाधिकाऱ्यांचे व समाजातील मान्यवरांचे, मान्यवर सभासदांचे मनापासून आभार व्यक्त करतो. श्री. विकास माने, श्री. सुरेश साळवी, श्री. सोनाजी भारती यांनी या सोहळ्याच्या संपन्नतेसाठी मोलाची मदत केली. मे. मयूर कॅटरर्स यांनीदेखील आमले योगदान दिले. कारण एखादी ब्राह्मण संस्था गेली ८५ वर्षे अव्याहतपणे समाजासाठी उत्कृष्ठ काम करीत आहे. याचे कारण ही संस्था उभारणीपासून आतापर्यंत यशस्वीपणे कार्यरत ठेवण्याचे काम या सर्व महानुभवांनी केले आहे. अशा या सर्व माजी पदाधिकाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांबद्दल मी व्यक्तिशः व संस्थेतर्फे कृतज्ञ आहे. या सर्वांचे आशिर्वाद आपल्या सर्वांना लाभावेत ही मनोमन प्रार्थना करतो आणि या सोहळ्यानिमित्त ज्या-ज्या सहकार्यांचे सहाय्य व मार्गदर्शन आम्हाला लाभले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो.

सध्याच्या कार्यकारी मंडळाच्या कार्यकाळात दोन कार्य आम्ही यशस्वीपणे करू शकलो याचा मला अभिमान आहे. १) बडोदे येथे झालेली रौप्य महोत्सवी न भूतो न भविष्यति अशा रितीने झालेली परिषद २) मे महिन्यात झालेला श्री लक्ष्मीनारायण मूर्तींची प्राणप्रतिष्ठा स्थापना सोहळा. लवकरच श्री लक्ष्मीनारायणाच्या देव्हाऱ्यात आपले आद्यगुरु श्री रामदास स्वामी व श्री एकनाथ महाराज यांच्या मूर्तींची पण प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. आपण सर्वांनी गेली दहा वर्षे आम्हाला भरभरुन प्रेम व आशिर्वाद दिले आहे व त्यामुळेच आमच्या हातून नेहमीच चांगले कार्यक्रम व सामाजिक उपक्रम केले जात आहेत. आपल्या सर्वांचे सहाय्य, मार्गदर्शन व प्रेम राहू द्यावे ही आपल्या सगळ्यांकडे प्रार्थना.

## संलग्न संस्था व त्यांचे कार्य

गेल्या अनेक समाचारमधून तसेच कार्यकारी मंडळाच्या सभामध्ये आपण संलग्न संस्था साजरे करत असलेल्या अनेक समारंभांना तसेच सामाजिक उपक्रमांना प्रसिद्धी देत आहोत.

आमच्या खालील संलग्न संस्थांनी जे सामाजिक उपक्रम राबविले ते मला नमूद करावेसे वाटतात व त्याच्याबद्दल आम्हां सर्वांना अभिमान आहे.

**सोलापूर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर या संस्थेला नुकताच कै. ल. गो. काकडे एज्युकेशनल फाऊंडेशन यांनी रु. १ कोटीचा निधी वर्ग केला असून सामाजिक विकासासाठी त्यांचे बरोबर करार करण्यात आला आहे. या करारान्वये सोलापूरातील बेरोजगार तरुणांना व तरुणींना कौशल्य विकास, उद्योजकता या विषयीचे शिक्षण दिले जाणार आहे. तसेच महिला व सुक्ष्म लघु उद्योगांसाठी कार्यशाळा बनविण्यात येणार आहे. हे सर्व उपक्रम देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणां व्यतिरिक्त इतर समाजातील लोकांसाठी सुद्धा

उपलब्ध असणार आहेत. सोलापूर संस्थेच्या या कार्याला सोलापूर तसेच महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धी मिळाली आहे. आकाशवाणी व दूरदर्शनवर सुद्धा याची माहिती महाराष्ट्रभर पोहोचली आहे.

माता-पित्यांनी गोपूजन करून द्वारकाधीश मंदिरातील दर्शनानंतर कलश पूजन अन उपनयन संस्कारापूर्वीचे विधी पार पडल्यावर रविवार दिनांक २१ मे २०२३ रोजी सकाळी १० वाजून १८ मिनिटांनी वेद मंत्राच्या घोषात सात बटूंवर अक्षता टाकण्यात आल्या. सोहळ्यात सहभागी मान्यवरांनी बटूंना आशिर्वाद दिले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण आणि ब्रह्म प्रतिष्ठानचा हा सामुहिक सोहळा आनंदाने पार पडला. बटूंना द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक यांनी मंदिर व्यवस्थापन आणि लेवा पाटीदार सामाजिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे श्रीमत भगवतगीता ग्रंथ आणि उपरणे देण्यात आले. आमदार सुभाष देशमुख, ह.भ.प. रणशूर महाराज यांनी बटूंना आशिर्वाद दिले. ब्रह्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुहास देशपांडे, सुजाता देशपांडे, उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, सचिव संजय गोखले यांना देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे या सोहळ्यासाठी ११ हजार रुपयांची देणगी देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत येळेगावकर यांनी देणगीचा धनादेश सुपुर्त केला. पार्थ प्रशांत पुरीकर, स्वानंद सागर देशपांडे (पुणे), जय राहुल कोल्हटकर, चिन्मय श्रीराम कुलकर्णी, वेदांत अनंत कुलकर्णी (कामती), अर्णव गौरव देशपांडे, अनिल अमोल कुलकर्णी या सात जणांचा सामुदायिक व्रतबंध सोहळयाचे वेदमूर्ती जयंत तुळजापूरकर यांनी पौरोहित्य केले. श्याम जोशी, सप्रे गुरुजी, चंदूकाका कुलकर्णी, नंदकुमार तुळजापूरकर यांनी सहाय्य केले. आमदार सुभाष देशमुख यांनी या सोहळ्यासाठी ५ हजार रुपयाची देणगी दिली.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था व ल.गो. काकडे एज्यकेशनल फाऊंडेशन यांचे या उपक्रमाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व आभार. इतर संलग्न संस्थांनी सुद्धा अशा प्रकारची समाजपयोगी कार्य करून आपल्या समाजाची प्रतिष्ठा उंचवावी, ही श्री समर्थ रामदास चरणी प्रार्थना.

**पुणे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, पुणे ही मध्यवर्ती मंडळाची संस्थापक संलग्न संस्था असून ती येत्या बलिप्रतिपदेला १०० वर्षात पदार्पण करत आहे. आपल्या सर्वांसाठी ही गोष्ट अभिमानाची आणि गौरवाची आहे. पुणे संस्था गेली १०० वर्षे अनेक सामाजिक उपक्रम राबवित आहे. तसेच शैक्षणिक मदत ही विद्यार्थ्यांना करत असते. पुणे शहाराच्या सामाजिक जडण-घडणीमध्ये देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण पुणे संस्थेचा मोठा वाटा आहे. याची प्रचिती म्हणजे पुणे संस्थेला अखिल ब्राह्मण महासंघातर्फे उत्कृष्ठ संस्था म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. पुणे संस्थेने शतक महोत्सवी वर्षात अनेक कार्यक्रम व सामाजिक उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे, त्याची माहिती आम्ही कळवूच. नुकतेच पुणे संस्थेने सहा बटूंच्या मुंजीबंधनाचा कार्यक्रम पार पडला. मुंजी बंधनाचे संस्कार केले. अल्पदरात बटूंवर योग्य ते संस्कार व्हावेत यादृष्टीने या आपल्या संलग्न संस्था नेहमीच कार्यरत असतात त्यांचे अभिनंदन.

शतक महोत्सवी वर्षात होणाऱ्या पुणे संस्थेच्या कार्यक्रमांना व सामाजिक उपक्रमांना आमच्या मध्यवर्ती मंडळाच्या हार्दिक शुभेच्छा.

**नाशिक** : श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक संस्था फार मोठे कार्य करत आहे. गेल्या वर्षी संस्थेच्या जुन्या दुर्गा मंगल कार्यालयामध्ये श्री दुर्गामातेची व श्री दत्तमहाराजांच्या मुर्तींची प्राणप्रतिष्ठा संस्थेने केली आहे. तसेच ऋग्वेद मंगल कार्यालयाचे विधिवत उद्घाटन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गेल्या वर्षी करण्यात आले. ही भव्यदिव्य वास्तू तिडके कॉलनीमध्ये उभारण्यात आली असून नाशिक शहराच्या सांस्कृतिक ठेव्यामध्ये वाढ झाली आहे. नाशिक संस्था प्रतिवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करत असते. तसेच गरजू ब्राह्मण कुटुंबांना दर महिन्याला सुद्धा आर्थिक मदत करत असते. प्रतिवर्षीप्रमाणे नाशिक संस्थेने २० बटूंच्या मुंजी बंधनाचा कार्यक्रम पार पडला. जेणेकरून ब्राह्मणांची संस्कृती, आचार-विचार जपण्यास मदत होत आहे. नाशिक संस्था व त्यांच्या कार्यकर्त्यांना मध्यवर्ती मंडळाच्या मनःपूर्वक शुभेच्छा व त्यांचे अभिनंदन.

**छत्रपती संभाजी नगर :** देशस्थ ऋग्वेदी सामाजिक मंडळ, छत्रपती संभाजी नगर ही आपली जुनी संलग्न संस्था २०१८-१९ पर्यंतच्या काळात निष्क्रिय झाली होती. जिचे पुर्नजीवन कै. शंतनु चौधरी व त्यांचे सहकाऱ्यांनी केले. व आतापर्यंत या संस्थेने सामुहिक रक्तदान, शालेय वस्तूंचे वाटप तसेच बटूंचे अल्पदरात मुंजीबंधन असे विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. नुकताच त्यांनी ५१ बटूंवर मुंजी बंधनाचे संस्कार केले. या समारंभास १२०० वर ब्रह्मवृंदानी उपस्थिती लावली होती. विशेष म्हणजे एवढा भव्य कार्यक्रम त्यांनी स्वतः पैसे जमवून साजरा केला. मध्यवर्ती मंडळाने या त्यांच्या उपक्रमास रु. १०,०००/- ची देणगी दिली आहे. अतिशय हरहुन्नरी तरुण कार्यकर्ते कै. शंतनु चौधरी यांनी संघटीत केले आहे त्याबद्दल त्यांचे कौतुक. कै. शंतनु चौधरी यांच्या आकस्मित निधनानंतर श्री. नरेश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली शहराती अनेक तरुण देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण एकत्रित झाले असून त्यांच्या समाजाकार्याला आमचा सलाम. कोविड काळात सुद्धा अनेक ब्राह्मण कुटुंबांना धान्य व गृहोपयोगी वस्तूंचे मोफत वाटप त्यांनी केले होते. त्यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल मध्यवर्ती मंडळ सदैव ऋणी असेल.

**मुलुंड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे यंदाही सामुदायिक व्रतबंधाचे संस्थेच्या ऋग्वेद सभागृहात बुधवार दि. १०.०५.२०२३ रोजी आयोजन करण्यात आले होते. ३ बटुंनी या आयोजनाचा लाभ घेतला. श्री. विनायक जोशी यांनी पौरोहित्य केले. संस्थेतर्फे पुण्याहवाचन करण्यात आले. व्रतबंधासाठी विश्वस्त मंडळाचे व कार्यकारी चे पदाधिकारी तसेच महिला शाखा अध्यक्षा व सदस्य उपस्थित होते. व्रतबंधाचे औचित्य साधून इच्छुकांनी संस्थेला देणगी दिली. कार्यक्रम अतिशय सुंदर झाला.

**बेळगाव :** बेळगाव येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ आणि समर्थ सहकारी सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने सामुदायिक उपनयन सोहळा दि. २२ मे रोजी चिंदंबरनगर येथील चिंदबरेश्वर देवस्थानात पार पडला. या प्रसंगी निपाणी ब्राह्मण समाजाचे चिटणीस अभिजीत मानवी व नेत्रतज्ज्ञ डॉ. माधुरी दिक्षित पाहुणे म्हणून उपस्थित होते.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे चेअरमन विनायक जोशी यांनी स्वागत केले. समर्थ सोसायटीचे चेअरमन अजय सुनाळकर यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. छाया जोशी यांनी डॉ. माधुरी दिक्षित यांचा सत्कार केला.या प्रसंगी चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष गोविंदराव फडके, कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष कानिटकर, वडगाव ब्राह्मण संघाचे अध्यक्ष बळवंत देशपांडे, अशोक जोशी आदी उपस्थित होते. ९ बटुंचे उपनयन करण्यात आले.



**इंदोर : डॉ. संदीप तारे यांचा सन्मान** - लालबहादूर शास्त्री इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड् मॅनेजमेंट या प्रतिथयश संस्थेने मागील ५ वर्षाच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल डॉ. संदीप तारे यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान भूतपुर्व लोकसभा अध्यक्ष श्रीमती सुमित्राताई महाजन आणि माजी केंद्रीय मंत्री श्री. अनिल शास्त्री यांच्या शुभहस्ते डॉ. श्री. तारे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. श्री. संदीप तारे यांचे अभिनंदन आणि पुढील सामाजिक शैक्षणिक कार्यास शुभेच्छा.

## देणगी

१) डॉ. जयंत गोविंद शेळगीकर (पुणे) यांचेकडून देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या सामाजिक कार्यास रु. २५,०००/- देणगी प्राप्त झाली आहे. डॉ. श्री. शेळगीकर यांचे मध्यवर्ती मंडळ आभार व्यक्त करीत आहे. या देणगीसाठी सौ. रोहिणी तळवडकर व सौ. केतकी कुलकर्णी यांनी देखील मोलाची मदत केली आहे.

२) श्री लक्ष्मीनारायण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास श्री. नितीन शहापूरकर (बडोदा) यांनी रु. ७,५००/- ची देणगी
३) श्रीमती शिल्पा सुरेश केळकर यांनी श्री लक्ष्मीनारायण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास रु. ५,०००/- ची देणगी.
४) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, नाशिक यांनी श्री लक्ष्मीनारायण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास रु. ५,००१/-ची देणगी.
५) श्री. रवींद्र नारायण संत, मुंबई यांनी श्री लक्ष्मीनारायण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास रु. २,५०१/- ची देणगी.
६) श्री. नरेंद्र कुलकर्णी (नाशिक) यांनी श्री लक्ष्मीनारायण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास रु. ५०१/- ची देणगी.
७) सौ. प्रज्ञा डोणगावकर (दादर) यांनी श्री लक्ष्मीनारायण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास रु. ५००/- ची देणगी.
मध्यवर्ती मंडळातर्फे देणगीदारांचे आभार.

## विद्यार्थ्यांना आवाहन

गेल्या अनेक वर्षापासून मध्यवर्ती मंडळ गरजू व हुषार विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी 'शैक्षणिक सहाय्य' देत आहे. 'शैक्षणिक मदत', 'कर्जाऊ शिष्यवृत्ती' व 'परदेशी कर्जाऊ शिष्यवृत्ती' अशा तीन योजनांमधून हे सहाय्य दिले जाते. यापैकी शैक्षणिक मदतीची रक्कम ही विद्यार्थ्यांना परत करावयाची नसते. मात्र अन्य दोन योजनांमधून दिली जाणारी रक्कम ही विद्यार्थ्याने शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मध्यवर्ती मंडळास हफ्त्या हफ्त्याने परत करावयाची असते. दिवसेंदिवस उच्च मध्यमिक व पदवी परिक्षेचे शिक्षण हे अधिकाधिक महाग होत आहे. त्यामानाने मंडळाकडून मदत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे फार अल्प आहे याची आम्हाला जाणीव आहे. या मदतीमध्ये वाढ करावी असा विचार चालू आहे. शैक्षणिक मदतीच्या निमित्ताने अनेक विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा मध्यवर्ती मंडळाशी संपर्क येतो. खरं म्हणजे ही परस्पर संबंधाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी आपला शिक्षणक्रम पूर्ण करून नोकरी वा व्यवसाय सुरु केल्यानंतर मध्यवर्ती मंडळाचे आजीव सभासदत्व अवश्य घ्यावे आणि नंतर आपल्या सवडीनुसार यथाशक्ती मंडळाच्या कामात मदत करावी. असे निर्दशनास आले आहे की, विद्यार्थ्यांना दिली जाणारी मदत ही बँकेत खाते नसल्याने मंडळाकडे परत येते. अशावेळी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी स्वतःचे बँक खाते उघडून मगच मंडळाकडे मदतीसाठी अर्ज करावा. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२३ राहील. शैक्षणिक सहाय्याचे माध्यमातून विद्यार्थी, पालक व मध्यवर्ती मंडळ यांचे परस्पर संबंधाचे नाते निर्माण होते, ते पुढील काळातही अधिक दृढ व्हावे अशी मनापासून इच्छा आहे. अर्जाचा नमूना मासिक पत्रिकेत दिला आहे.

## सभासदांसाठी आवाहन

बंधू! भगिनींनो! आपण समाचारचे नियमित वाचक आहात. ह्यात आपल्याला काय आवडले, काय नावडले हे आम्हाला जरुर कळवा. अंकात काय सुधारणा हव्या आहेत ते ही कळवा. आपले विचार समाचारमध्ये सतत सुधारणा करण्यास उपयुक्त ठरतील. बंधू! भगिनींनो! तुम्हाला समाचारचा अंक मिळत नसल्यास आवर्जून कार्यालयात चौकशी करून आपल्या सर्व नोंदी अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. ईमारत पुर्नबांधणी वगैरे कारणामुळे पत्ता बदलला जातो. सभासदांना अंक मिळत नसल्यास आपला बदललेला पत्ता पिन कोडसहीत मध्यवर्ती कार्यालयास कळवावा. सभासदांना पाठविलेले समाचारचे काही अंक सातत्याने पोस्टातून 'पत्यावरील व्यक्ती न सापडल्याने परत' असा शेरा मारुन परत येत आहे. या सभासदाला पत्रिका पाठविणे बंद करीत आहोत. ज्या सभासदाला अंक मिळत नसतील त्यांनी आपले नाव आणि बिनचूक पत्ता पिनकोड सह कार्यालयात तसे कळवावे. समाचारच्या लोकप्रियतेसाठी नवनवीन विचारांची, सल्याची, मार्गदर्शनाची अपेक्षा.

**– संपादक**

अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२३ राहील. अर्ज मूल्य : रु. ५०/-

पावती क्रमांक : ...................... अर्ज क्रमांक : ...................... अर्ज प्राप्त क्रमांक : ......................

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

## शैक्षणिक मदतीसाठी अर्ज

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२४३० ७५७३

प्रति,
मा. कार्यवाह,
अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग,
बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

महोदय,

मी, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून मला मंडळाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक मदतीची आवश्यकता आहे. तरी मला नियमाप्रमाणे शैक्षणिक मदत मंजूर करावी ही नम्र विनंती. यासाठी खालील माहिती देत आहे.

१) संपूर्ण नाव : ____________________

२) पत्र व्यवहाराचा पत्ता : ____________________
मु.पो. __________ तालुका __________ जिल्हा __________ पिन कोड __________

३) __________ या शैक्षणिक वर्षात पूर्ण केलेला अभ्यासक्रम __________
मिळालेले टक्केवारी गुण (शेकडा) __________ (सोबत गुणपत्रक जोडावे)

४) __________ या शैक्षणिक वर्षात घ्यावयाचा शिक्षणक्रम

५) ज्या शिक्षण संस्थेत उपरोक्त शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे तिचे नांव पत्ता __________
__________ (सोबत अधिकृत प्रवेश दाखला/बोनाफाईड सर्टिफिकेट जोडावे)

६) पालकांचे नांव व संपूर्ण पत्ता __________
__________ पिन कोड __________

७) पालकाचे विद्यार्थ्याशी नाते __________

८) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. __________

९) अवलंबून असलेल्या व्यक्तींची (संख्या) __________ पैकी शिक्षण घेत असलेले __________

१०) अन्य शैक्षणिक सवलत मिळते काय __________ (होय / नाही)

११) परिचित प्रतिष्ठित व्यक्तिचे नाव व पत्ता __________
__________ पिन कोड __________

१२) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असल्याबाबतचे मान्यवर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण व्यक्तीचे अगर ज्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेचे कार्यक्षेत्रात विद्यार्थ्यांचे वास्तव्य आहे त्या संस्थेचे शिफारस पत्र जोडावे.

स्थळ : __________ अर्जदाराची सही : __________

दिनांक : __________ पालकाची सही : __________

**टीप** : १) कोणीही विद्यार्थ्यास शैक्षणिक मदत किंवा कर्जाऊ शिष्यवृत्ती यापैकी एकाच योजनेचा लाभ घेता येईल. २) गुणपत्रिका, बोनाफाईड सर्टिफिकेट व दे.ऋ.ब्रा. दाखला यासारख्या गोष्टींची पूर्तता करावी यासाठी वारंवार पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. कारण टपाल हशील बरेच वाढले आहे. ३) अर्ज मंजूरी निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. ४) या संबंधीचा निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार कार्यकारी मंडळावर राहील.

---

**कार्यालयीन टिप्पणी**

श्री./कु. __________ यांचा शैक्षणिक मदतीचा अर्ज दिनांक __________
रोजी झालेल्या शैक्षणिक मदत व कर्जाऊ शिष्यवृत्ती अर्ज छाननी समितीचे सभेत मंजूर करण्यात आला आहे.

**कार्यवाह**

# समर्थांच्या सामाजिक जाणीवा

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

समर्थांच्या सामाजिक जाणीवा या विषयाचे चिंतन आपल्याला करायचे आहे. माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय माणसाचे जगणे प्राण्यासारखेच असेल. माणसाने केलेली प्रगती ही समाजात राहून व समाजाच्या मदतीनेच व समाजासाठीच केलेली आहे. माणूस हा पुर्वीपासूनच समाजाशी किंवा फार पुर्वी आपल्या कळपाशी जोडून राहत आलेला आहे. आपल्याला समाजाची मदत होते व आपणही समाजाचे देणे लागतो ही एक नैसर्गिक भावनाच आता बनलेली आहे. मागील दोन तीन दशकात आपल्या समाजात सुबत्ता आली आहे, यंत्रांचा शिरकाव झाला आहे आणि माणूस कुठेतरी मी एकटाही या जगात टिकू शकतो व मला इतर कोणाचीही गरज नाही असे मानू लागला आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे तो समाजापासून तुटतोय, फ्लॅट संस्कृतीमुळे तो एकलकोंडा बनत आहे. अशा पार्श्वभूमीवर सुमारे चारशे वर्षांपूर्वी समर्थांनी शिकवलेली सामाजिक जाणीव आपण मुद्दामहून अभ्यासली पाहिजे.

समर्थ आणि सामाजिक समरसता किंवा समाजाभिमुखता हे समर्थांच्या प्रत्येक शिकवणुकीचे सार आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दाचा, साहित्याचा व सांगण्याचा तो सार आहे. जेव्हा समर्थ प्रयत्नवादाची शिकवण देतात, ध्येयवादाची शिकवण देतात, तेंव्हा तो प्रयत्नवाद वा ध्येयवाद हा समाजाशीच निगडित असतो, संघटनेशी निगडित असतो. आपल्या स्वतःशी तो निगडित असतोच असतो पण तो प्रयत्नवाद बाकीच्या समाजासाठी जास्तीत जास्त उपयोगात आणावा असे समर्थांचे नेहमी सांगणे असते.

**शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे । उणे पडो न द्यावे । कोणी एकाचे ।।**

शरीर परोपकारी लावावे हे सांगणे किंवा या पाठीमागची भूमिका काय असू शकते? आपले शरीर परोपकारी लावायचं याचा अर्थ असा कि तुम्ही ते दुसऱ्यासाठी झिजवायचे आहे, दुसऱ्यांच्या कार्यात कामी आणायचे आहे. दुसऱ्यासाठी म्हणून ते शरीर आपल्याला उपयोगात आणायचे आहे. अशा शिकवणुकीमधून समर्थांची समाजाशी असलेली बांधिलकी दिसते. समर्थांनी खरे तर ती मनापासून स्वीकारलेली आहे.

समर्थांच्या प्रत्येक वचनात, मनाच्या श्लोकात, दासबोधात ती दिसते. आता काही वेदांतावर आधारित, तत्वज्ञानपर काही ग्रंथही आहेत पण विशेषतः श्रीमत् ग्रंथराज दासबोध जर आपण वाचला, अभ्यासला, समर्थांचे मनाचे श्लोक जर पाहिले, त्यांचा जर अभ्यास केला तर आपल्याही लक्षात येईल की मुळात मनाच्या श्लोकांची रचना सुद्धा समर्थांनी स्वतःसाठी केलेली नाही. आपले हे मन दुसऱ्यांसाठी आपल्याला कुठे तरी उपयोगात आणता येते का? या शरीराचा, या आपल्या कार्याचा किंवा आपल्या एकूण प्रयत्नवादाचा दुसऱ्यासाठी काही उपयोग आपल्याला करता येऊ शकतो का? हे सगळे सांगण्यासाठी समर्थांनी मनाच्या श्लोकांची रचना केली होती आणि ह्या मनाच्या श्लोकांची रचना करित असताना त्याच्यामध्ये व्यक्तिगत किंवा वैयक्तिक असे चिंतन आपल्याला फारसे काही पाहायला मिळत नाही. दोन्ही अर्थाने पाहिले तर असे आहे की शरीर हे माध्यम आहे श्री समर्थ म्हणतात की हे तू स्वतःसाठीच, तुझ्या कार्यासाठीच जर तुझं शरीर वापरलं, हे तुझ्यापुरतंच मर्यादित ठेवलं तर मग काही त्याचा फायदा नाही. तसे केले तर इतर प्राण्यांमध्ये आणि मनुष्य प्राण्यांमध्ये फारसा काही फरक राहणार नाही. इतर प्राणीही जीवन जगतात, इतर प्राणीही स्वतःसाठी सगळं करत असतात, माणसांमध्येच असे एक कौशल्य आहे, माणसांमध्ये अशी एक कर्तृत्व शक्ती आहे, माणसांमध्ये असे एक सामर्थ्य दडलेले आहे. त्याच्यामध्ये ती एक सुप्त शक्ती आहे की तो स्वतःचेही हित साधून घेऊ शकतात व दुसऱ्यांसाठी म्हणून उपयोगी पडू शकतात. (क्रमशः)

# योगसाधना - आपली जीवनशैली

**विनया पुंडे** (मो. : ९९८७०७८९६६)

योगशास्त्र भारतीयांसाठी नवीन नाही. योगोपचार पद्धत ही भारतीयांना सुपरिचित आहे. योगीजनांची अनेक आणि प्रत्यक्ष उदाहरणे ही भारतीय समाजासमोर युगानुयुगे आहेत. अगदी प्राचीन ऋषिमूनींना सोडले तरी वर्तमानात आपले पंतप्रधान, बाबा रामदेव यांसारखे अनेक यशस्वी व आदर्श व्यक्तिमत्व भारतीयांसमोर नव्हे जगासमोर आहेत.

योगशास्त्र सनातन व समग्र आहे. सनातन तर आहेच ४००० वर्षांपूर्वी पातंजलीनी अष्टांग योग सांगितला. तेव्हा पासून आज तुमच्या माझ्यापर्यंत योगशास्त्र पोहोचले आहे. योगशास्त्र समग्रतेने जीवनाला वळण लावते. व्यक्तिचा सर्वांगीण विकास होऊन, यमनियमांच्या माध्यमातून सामाजिक सोहार्द्र, शांती, संपन्नता, तसेच सृष्टीचे संरक्षण आणि स्थूल अस्तित्त्वापासून परमेष्ठी पर्यंत सूक्ष्म उन्नती घडविणारे शास्त्र आहे. योग घडविणारे, जोडणारे शास्त्र आहे.

योग साधना समग्रतेने आपल्या व्यक्तिमत्त्वाची उन्नति साधते. योगामूळे आपले स्थूल शरीर किंवा अन्नमय कोश याची शुद्धी होते. शरीर शुद्धी नियमितपणे झाली की आपली रोग प्रतिकार क्षमता वाढते. आरोग्य सुधारते, शरीरातील दुखणे सहज कमी होते, शरीराची लवचिकता वाढते त्यामुळे योगसाधना करता करता सामर्थ्य वाढते. कितीही मेहनत झाली तरी थकून जायला होत नाही. आधुनिक वैद्यक शास्त्राने न बरे होणारे विकार घोषित केले आहे ते सारे विकार योगसाधनेने बरे होऊ शकतात असा अनुभव आहे. डोळ्यांचे तेज वाढते, चेहऱ्यावर चकाकी येते, आवाज स्पष्ट व मधुर होतो.

प्राणमय कोशाची शुद्धी होण्यासाठी प्राणायामासारखा दुसरा पर्याय नाही. श्‍वसन दीर्घ व खोल होऊ लागते, फुफुसांची क्षमता वाढते. प्राणवायुचा अधिक पुरवठा होऊन रक्तशुद्धी होते. रोगप्रतिकार क्षमता वाढते. चित्ताची एकाग्रता वाढते. चित्त विशाल होऊ लागते. बुद्धी कुशाग्र होऊ लागते. संयमन व नियंत्रण जमू लागते. विवेक जागृत होऊ लागतो. त्यामुळे विचारांना प्रगल्भता येते. जसे विचार तसे आचार. आपले आचरण सुधारते. आपल्यामधे परिवर्तन होऊ लागते. सहनशीलता वाढते त्यामुळे काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यावर नियंत्रण जमू लागते. निर्णयक्षमता चांगली होते.

किती म्हणून योग माहात्म्य सांगावे? पण सर्वांनाचा असे अनुभव सहजी येत नाहीत असे वाटते. योग करूनही आजार व औषधे मागे लागलेली असतात. योग करूनही व्यक्तिमधील परिवर्तनाचा परिणाम कुटूंब व समाज यांवर दिसत नाही हे खरे आहे.

योगसाधना इतकी प्रभावी असून देखील त्याचा परिणाम मात्र दिसत नाही कारण आपण योगसाधनेला जीवन शैलीचा भाग बनवत नाही. योगसाधना एखादा तास आपल्या दिनचर्येला भाग असूं शकतो, पण योग व्यापक व समग्र असल्यामुळे तो आपल्या दिनचर्येला व्यापून रहायला तरच त्याचे सुपरिणाम अनुभवता येतात. योगसाधनेला आपल्यापासून वेगळे ठेऊन त्याचा सर्वांगीण परिणाम ना व्यक्तिवर दिसत ना समाजावर. योगसाधना जीवनशैली बनवून आपण आपले समाजाचे जीवन सफल करुया. भारत देश अध्यात्मिक गुरू व्हायला वेळ लागणार नाही.

योगसाधना जीवन शैलीचा भाग बनवण्याचे तंत्र आहे. त्यामधे यमनियमांचे पालन केल्यासच योगामध्ये सातत्य टिकून राहते. योगावर श्रद्धा व सातत्य असल्याशिवाय योगसाधना फलीभूत होत नाही.

## दुःखद निधन



मध्यवर्ती मंडळाच्या सभासद व विलेपार्ले संघाच्या पदाधिकारी श्रीमती मंदाताई श्रीकांत खेडेकर (सुप्रसिद्ध कलाकार सचिन खेडेकर यांच्या मातोश्री) यांचे बुधवार दिनांक १७ मे २०२३ रोजी दुःखद निधन झाले. श्रीमती मंदाताई या मध्यवर्ती मंडळाच्या आणि विलेपार्ले संस्थेच्या क्रियाशील पदाधिकारी म्हणून कार्य केले आहे. संस्थेच्या सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग असे. मोखाडा येथील आदिवासी भागात झालेल्या सार्वजनिक कार्यक्रमात तसेच ठाणे संस्थेच्या दिनदर्शिका प्रकाशनाच्या कार्यक्रमात त्या श्री. सचिन सह सहभागी झाल्या होत्या. एक हसरे आणि आनंदी व्यक्तिमत्व आज आपल्यात नाही. मध्यवर्ती मंडळातर्फे श्रीमती मंदाताई यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ


**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील**

### खालील मंगल कार्यालय


**तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

### अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**
**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

**माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवान विद्यार्थी-विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन!**



## जोडीदार निवडा

**वर पाहिजे.........................................................................................................**

● **कु. अपूर्वा मोहन बहिरट**. ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, भ्रमणध्वनी ९८७०७१४७३०, ९८७०७५७००४, पत्ता : कांदिवली, मुंबई, जन्म तारीख/वेळ : ११.०७.१९९३, सकाळी ११.३५, जन्मस्थळ : नाशिक, उंची : ५ फूट, गोत्र : बादरायण, रास : मीन, नक्षत्र : रेवती, चरण : १, गण : देव, नाडी : अंत्य, मंगळ : नाही, वर्ण : गहू वर्ण, बांधा : मध्यम, शिक्षण : B.Com, नोकरी व ठिकाण : मुंबई, हुद्दा (पोस्ट) : Sr. Accountant Executive, अपेक्षा : प्रथमवर, उंची ५ फूट ४ इंच ते ५ फूट ८ इंच. मुंबई पुणेस्थित प्राधान्य, कोणत्याही शाखेचा पदवीधर, स्वतःचे घर असावे, निर्व्यसनी, समंजस, मनमिळावू.

● **समृद्धी रविंद्र नाशिककर**, पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्म १९.१०.१९९७, गोत्र : गौतम, वर्ण : गहूवर्ण, उंचीः ५.२, शिक्षण : जी.डी. आर्ट, ए. टी. डी. बी. ए. अंतीम (संस्कृत), नौकरी : माध्यमिक इंग्रजी स्कूल, अपेक्षा : पदवीधर, चांगली नोकरी, संपर्क : रविंद्र नाशिककर ९३७२१०२४७७, आई : ९६०४४५३४३४ सोलापूर.

● **ज्योती महेश केसकर**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : ११.०६.१९९७, गोत्र : विश्वमित्र, वर्ण : गोरा, उंची ५.६, शिक्षण : ME Tech नोकरी, वार्षिक उत्पन्न : ५.२५ लाख, अपेक्षा : बी. ई. इंजिनिअर आयटी, संपर्कः महेश माधव केसकर ८१७७९११९९, आई ९७६३३११५०१. सोलापूर.

● **अमृता आनंद कुलकर्णी**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : २४.०२.१९९८, गोत्र : वसिष्ठ, वर्ण : निमगोरा, उंची : ५.४, शिक्षण : BE Comp Eng., नोकरी आहे, अपेक्षा : BE Comp Eng., संपर्क : आनंद दिगंबर कुलकर्णी ९४२२६४६२२४, सोलापूर.

● **उत्कर्षा रामकृष्ण हरी कुलकर्णी**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : १३.०६.१९९६, गोत्र : काश्यप, वर्ण : निमगोरा, शिक्षण : एम. एम. सी. मायक्रो बायालॉजी, नोकरी : ठाणे, वार्षिक उत्पन्न ३.६० लाख, अपेक्षा : र्निव्यसनी, सुस्थीतीत, चांगली नोकरी, संपर्क : रामकृष्ण हरी कुलकर्णी ७०५७७५४४११, आई ९७६७५३६१२९.

● **पूजा चंद्रकांत कुलकर्णी**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : १८.११.१९९७, गोत्र : भारद्वाज, वर्ण : निमगोरा, उंची : ५.३, शिक्षण : बी. एस. सी., नोकरी नाही, अपेक्षा : सुसंस्कारीत, चांगली नोकरी, संपर्क : चंद्रकांत कुलकर्णी ८४५९९५८४९५. अक्कलकोट.

● **शर्वरी कुलकर्णी**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : ९.९.१९९३, गोत्र : भारद्वाज, वर्ण : गहूवर्ण, उंचीः ५.४, शिक्षण : एम.एम.सी. गणित, बी.एड. शास्त्रीय गायन चार परीक्षा, नोकरी नाही, अपेक्षा : चांगली नोकरी, संपर्क : सुनिल कुलकर्णी ९४२३४७३६५६, आई ९८५०५०३७६०.

● **धनश्री कोतवाल**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : ११.११.१९९६, गोत्र : भारद्वाज, वर्ण : गोरा, उंची ५.२, शिक्षण : एम.एम.सी. न्यूअर्ट्रीशन कन्सल्टंट, वार्षिक उत्पन्न : तीन लाख, अपेक्षा : शिकलेला, चांगली नोकरी, संपर्क : राघवेंद्र कोतवाल. ९६३७१३४३५२

● **सौम्या विप्र**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : २८.११.१९९६, गोत्र : भारद्वाज, वर्ण : निमगोरा, उंचीः ५.२, शिक्षणः बी.सी.ए., एम.सी.ए., नोकरी : एम.एन.सी. ४.८७ लाख, अपेक्षा : पी.जी. जॉब, संपर्क : श्रीप्राद विप्र ९८२३९२४३२४, औरंगाबाद.

● **डॉ. प्रांजली मार्डिकर**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : ११.०६.१९९६, गोत्र : वसिष्ठ, वर्ण : गोरा, उंची : ५.१, शिक्षण : बी.डि.एस. स्वतंत्र दवाखाना, अपेक्षा : इंजिनिअर डॉक्टर, संपर्क : सुहास मार्डिकर ९८९०४२८४०८.

● **सीमा कोन्हालीकर**, पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : १३.११.१९९५, गोत्र : कौण्डिन्य, वर्ण : निमगोरा, उंची : ५.४, शिक्षण : बी.ई.ई. ॲन्ड् टी.सी. नोकरी १५ लाख वार्षिक उत्पन्न, अपेक्षा : वेल सेटेड असावा, संपर्क : सुधीर कोन्हाळीकर ९४२३४२१३४९.

(**टीप** : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील.)

# SHRI YASH TOURS

Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

आयोजक - श्रीकांत पाटसकर CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS
E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | | |
|---|---|---|
| हिमालयातील दोन धाम, केदारनाथ, बद्रीनाथ हरीद्वार हृषिकेश | जून १७<br>खर्च प्रत्येकी रू. ३२,००० + विमान | ८ रात्र |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | ऑगस्ट १८<br>खर्च प्रत्येकी रू.१३,००० + रेल्वे | ३ रात्र |
| पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट | ऑगस्ट २५<br>खर्च प्रत्येकी रू. ११,००० + रेल्वे | ३ रात्र |
| काश्मीर , श्रीनगर, सोनमर्ग, गुलमर्ग, पहलगाम व कारगील | सप्टेंबर २<br>खर्च प्रत्येकी रू. ३०,००० + विमान | ७ रात्र |
| कारगील, लेह - लडाख | सप्टेंबर ८<br>खर्च प्रत्येकी रू. ३८,००० + विमान | ७ रात्र |
| हिमालयातील चार धाम, गंगोत्री, यमनोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ, हरीद्वार हृषिकेश | सप्टेंबर २९<br>खर्च प्रत्येकी रू.४२,००० + विमान | ११ रात्र |
| राजस्थान, मारवाड , जयपुर,जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | ऑक्टोबर २५<br>खर्च प्रत्येकी रू.३०,५०० + विमान | ६ रात्र |
| शृंगेरी, उडिपी, गोकर्ण, मुरडेश्वर | नोव्हेंबर ५<br>खर्च प्रत्येकी रू. २४,५०० + विमान | ५ रात्र |


कॉसमॉस मुदत ठेवी
जीवनी हास्य फुलवी !
खास ज्येष्ठ नागरिकांसाठी
ठेवींवर आकर्षक व्याजदर
7.50%*
सर्वसाधारण / संस्थांसाठी व्याजदर
7.10%*
*अटी लागू, ROI p.a.
व्याज पर्याय : मासिक, त्रैमासिक आणि एकत्रित
कालावधी : ३६ महिन्यांच्या पुढे ते १० वर्षापर्यंत
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
रजिस्टर्ड ऑफिस : कॉसमॉस टॉवर, प्लॉट क्र. ६, आय.सी.एस. कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड,
गणेशखिंड, पुणे - ४११००७. टोल फ्री : 18002330234
E-mail : customercare@cosmosbank.in | https://www.cosmosbank.com |

# ऋग्वेद भूषण - अतुल एन. खिरवाडकर



श्री. अतुल एन. खिरवाडकर यांचा जन्म २४ जानेवारी १९५९ रोजी इंदौर, मध्यप्रदेश येथे झाला. माध्यमिक शिक्षण कल्याण येथे बिर्ला कॉलेज मुंबई विद्यापीठाअंतर्गत झाले. वाणिज्य विषयात पदवीधर आहेत. ICWA, CAIIB1 प्रमाणित प्रणाली विश्लेषक, ट्रेझरी मॅनेजर या विषयात पदव्युत्तर पदवीधर आहेत. एक तज्ञ बँकर राष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त श्री. अतुल खिरवाडकर हे बँकींग क्षेत्रातील त्यांचे Youtube चॅनल देखील आहे. बँकींग क्षेत्रातील भारतातील सर्व बँकांची शिखर संस्था इंडीयन बँकस् असोसिएशस्या सहकार क्षेत्रातील कार्यकारिणी प्रतिनिधी म्हणून देखील काम पाहीले आहे. कल्याण जनता सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची जबाबदारी सांभाळत असताना राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे NUCFDC पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. देशातील सर्व नागरी सहकारी बँकासाठी चांगले परिवर्तन म्हणून ते काम करतील. कल्याण जनता सहकारी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरून दिल्ली स्थित, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या संघटनेला अंम्ब्रेला ऑर्गनायझेन असे संबोधण्यात आले आहे. अतुल खिरवाडकर हे ४३ वर्षाहून अधिक काळ बँकींग क्षेत्रात कार्यरत आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँकामध्ये १५ वर्षाचा आणि सहकारी बँकींगमध्ये २८ वर्षाचा त्यांना अनुभव आहे. सहाहजार कोटी रुपयांचा व्यवसाय असलेल्या आघाडीच्या मल्टीस्टेट शेड्यूल्ड को-ऑप. बँकेत ते गेल्या १४ वर्षापासून व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. बहुराज्य सहकारी कायद्यातील प्रस्ताविक सुधारणाबाबत त्यांना नुकतेच संयुक्त संसदीय समिती समोर प्राचारण करण्यात आले होते. अतुल खिरवाडकर ही व्यक्ती सहकार क्षेत्रातील एक नामांकित तज्ञ असून, सहकारी क्षेत्राचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या या पदाला न्याय देण्याची पुर्ण क्षमता श्री. खिरवाडकर यांच्यामध्ये आहे. देशातील नागरी सहकारी बँकांना आता एकाच क्षेत्राखाली सेवा मिळणार असून या बँकांच्या अडचणी सोडवण्यासोबत त्यांना पाठबळही दिले जाणार आहे. यासाठी रिझर्व्ह बँकेच्या पुढाकारातून नागरी सहकारी बँकासाठी देशव्यापी शिखर संस्था स्थापन होत आहे. तिच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी श्री. खिरवाडकर यांची नियुक्ती ही अभिमानाची बाब आहे. नागरी सहकारी बँकांना विविध सेवा यात कर्ज सुविधा, तरलता पुरविणे, निधी व्यवस्थापन, गुंतवणूक, देयक आणि तडजोड, माहिती तंत्रज्ञान, ए.टी.एम. नेटवर्क, व्यवस्थापक सल्ला, भांडवल उभारणे, डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड, कर्जरोख्यांची खरेदी-विक्री आणि नागरी बँकाच्या विलीनीकरण आणि एकीकरण प्रक्रियेमध्ये सहकार्य करणे आदि भूमिका महामंडळ करणार आहे. कल्याण जनता सहकारी बँकेच्या विविध पदाच्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत. बँकेची प्रगती सुरुवातीच्या काळात १०० कोटीच्या व्यवसायापासून एप्रिल २०१० मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी व सरव्यवस्थापक या पदाचा कार्यभार सांभाळत १ हजार कोटीचा व्यवसाय तसेच १३ शाखावरुन ४२ शाखा ही प्रगती त्यांनी गाठली आहे. गेल्या ५ वर्षामध्ये विविध संस्थांनी कल्याण जनता सहकारी बँकेस ३० पुरस्कारांनी गौरविले आहे. यात महाराष्ट्र शासनाच्या पुरस्काराचा देखील समावेश आहे.

स्वायत्त मंडळाच्या अभ्यास मंडळावर देखील ते काम करीत आहेत. मुंबई विद्यापीठाने त्यांना बँकींग विषयी तज्ञ म्हणून मान्यता दिली आहे. बँकींग अभ्यासक्रमावर आर.बी.आय द्वारे पुरस्कृत केलेल्या भारतीय सहकारी संस्था IIBM ला देखील ते मदत करतात. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या रौप्य महोत्सवी बडोदा गुजरात अधिवेशनास श्री. खिरवाडकर यांची मोलाची मदत आणि मार्गदर्शन झाले आहे. श्री. खिरवाडकर हे सहकार आणि बँकींग क्षेत्रातील तज्ञ असल्याचे देशस्थ ऋग्वेदी समाजाचे भूषण आहे. श्री. खिरवाडकर यांना 'ऋग्वेद भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याचा संस्थेस बहुमान मिळाला आहे. देशाच्या राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. खिरवाडकर यांना पुढील यशस्वी कारकिर्दीस अनेक अनेक शुभेच्छा.

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**

# मयुर कॅटरर्स

दादर, माहिम, माटुंगा येथे लग्न व इतर
कार्यासाठी हॉल पॅकेजसहीत उपलब्ध.
तसेच डेकोरेशन, जेवण, आईस्क्रिम इत्यादी व्यवस्था केली जाईल.



पत्ता : तावडे वाडी, रूम नं. 05, तळमजला, भवानी शंकर रोड, चितळे पथ,
पोर्तुगीज चर्चच्या मागे, वर्तक हॉलच्या बाजुला, दादर(प.), मुंबई-28.

ईमेल : mayurcaterers@gmail.com । www.mayurcaterers.net

फोन : 9322224550 । 9324923020 । 9320291509 । 9821147636
9004200752 । 9320009672 । 022-24306246

*Best wishes from*

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELAGAVI.

**HEAD OFFICE :** "Samarth Sadan", Gurukrupa complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI - 01. Phone : 0831-2431357, 2403968 e-mail : samarthsociety@yahoo.com Website : www.samarthsociety.co.in

**R C NAGAR BRANCH :** "Bhagirathi" R.S. No. 731/D-2, 'C' Scheme, Channamma Nagar, Main Road, BELAGAVI - 06. Phone : 0831-2443181

**TILAKWADI BRANCH :** "Classic Plaza" CTS 44/A2, Somwarpeth, Tilakwadi, BELAGAVI - 06. Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH :** CTS 1103, 1st Floor, Bichu Galli, Shahapur, BELAGAVI - 03. Phone : 0831-2431257

**KHANAPUR BRANCH :** 1524/A6, Mannerkar Building, Beside State Bank, Belagavi-Goa Road, KHANAPUR. Mob. : 6363090655

## UNIQUE DEPOSIT SCHEME WITH ATTRACTIVE RATE OF INTEREST

### AKSHAY DEPOSIT

| | | | Regular | For Senior Citizen |
|---|---|---|---|---|
| 1) | 46 days to 180 days | ... | 6.00% p.a. | -- |
| 2) | 181 days to 364 days | ... | 6.50 p.a. | -- |
| 3) | 1 Year | ... | 8.00% p.a. | 9.00% p.a. |
| 4) | 2 Years | ... | 9.00% p.a. | 10.00% p.a. |
| 5) | 3 Years | ... | 10.00% p.a. | 11.00% p.a. |

**KALPATARU DEPOSIT : Double in 84 Months**

**GOLD LOAN 12.00% p.a.**

### LOAN SCHEMES

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Personal Security Loan | ... | 16.00% p.a. |
| 2) | Mortgage / Hypothecation / Business / Cash Credit / Govt. Security / Education Loan | | |
| | * Up to Rs. 10 Lakhs | ... | 14.25% p.a. |
| | * Above Rs. 10 Lakhs & upto Rs. 25 Lakhs | ... | 14.50% p.a. |
| | * Above Rs. 25 Lakhs upto Rs. 50 Lakhs & Above | ... | 15.00% p.a. |

### NIRANTAR (Recurring Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 Year | 8.00% p.a. |
| 2) | 2 Years | 9.00% p.a. |
| 3) | 3 Years | 10.00 p.a. |

### MADHU SANCHAY (Pigmy Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 6 Months | 3.00% p.a. |
| 2) | 1 Year | 4.00% p.a. |



**Ajay A. Sunalkar**
Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni
Abhay V. Joshi
Sou. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh Sunagar
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Sou. Chaya N. Joshi
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri



**Suhas R. Kulkarni**
Vice Chairman

Arvind S. Kulkarni (Secretary)

Raghavendra S. Kesnur (Gen. Manager)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




**काकडे फाऊंडेशन आणि दे.ऋ.बा. सोलापूर यांच्यात सामंजस्य करार**





**श्रीलक्ष्मी-नारायण मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा, मुंबई**

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH